*Tukaram Maharaj Haripath । सार्थ श्री तुकाराम महाराज हरिपाठ*

*अभंग*

*- १ -*

*नमिला गणपती माऊली सारजा । आता गुरुराजा दंडवत ॥*

*गुरुराया चरणी मस्तक ठेविले । आपुल्या स्तुतीला धावी मती ॥*

*गुरुराया तुज ऐसा नाही सखा । कृपा करी रंका धरी हाता ॥*

*तुका म्हणे माता पिता गुरू बंधू । तूंचि कृपासिंधु पांडुरंगा ॥*

*- २ -*

*पहाटेच्या प्रहरी म्हणा हरि हरि । तया सुखी सरी नाही दुजे ॥*

*केशव वामन नारायण विष्णु । कृष्णसंकर्षणु राम राम ॥*

*माधवा वामना श्रीधरा गोविंदा । अच्युता मुकुंदा पुरुषोत्तमा ॥*

*नरहरि भार्गवा गोपाळा वासुदेवा । हृषिकेशा पावा स्मरणमात्रे ॥*

*॥ तुका म्हणे ओका नामी भाव राहे । तेव्हां होय साह्य पांडुरंगा ॥*

*- ३ -*

*अयोध्या मथुरा काशी अवंतिका । कांची हे द्वारका माया सत्य ॥*

*मोक्षपुऱ्या जैशा नित्य वाचे स्मरे । प्राणी तो उद्धरे स्मरणमात्रे ॥*

*नित्य नेम मनी हरि आठवावा । तेणेचि तरावा भवसिंधु ॥*

*तुका म्हणे जैसा नामाचा महिला । राहील जो नेमा तोचि धन्य ॥*

*- ४ -*

*यमुना कावेरी गंगा भागीरथी । कृष्णा सरस्वती तुंगभद्रा ॥*

नर्मदा आठवी वेळोवेळ वाचे । नाही भय साचे प्राणियांसी ॥

तया संगती प्राणी उद्धरती ।। दर्शनेच होती मुक्ति प्राप्त ॥

तुका म्हणे नामी एकनिष्ठ भाव । तेथे वासुदेव सर्वकाळ ॥

- ५ -

प्रातःकाळी नाम पवित्रची घ्यावे । तेणे विसरावे जन्म मृत्यु ॥

नळ युधिष्ठर जनक जनार्दन । स्मरणेची धन्य होती प्राणी ॥

न करा आळस नाम घेतां वाचे । नाही भय साचे प्राणिसायी ॥

तुका म्हणे वाचे गाईल गोविंद । होईल परमानंद नामे ओका ॥

- ६ -

कश्यप गौतम भारद्वाज अत्री । ऋषि विश्वामित्र नाम थोर ॥

जमदग्नि मुनि वसिष्ठ वर्णिला । तिन्ही लोकी झाला वंद्य ॥

नाम घेतां तुरे पाप ताप दैन्य । होय थोर पुण्य उच्चारितां ॥

तुका म्हणे जैसा उच्चारिता वाणी । तेणे अंतःकरणी सुख होय ॥

- ७ -

अहिल्या द्रौपदी सीता तारा चारी । मुख्य मंदोदरी पतिव्रता ॥

नामे घेतां त्यांची वाणी हे पवित्र । होय कुळ गोत्र उद्धरण ॥

संकल्प विकल्प सांडोनिया दुरी । वाचे हरि हरि उच्चारावे ॥

नाही बद्धकथा तया संसाराची । जाचणी यमाची मग कैची ॥

तुका म्हणे नाम पवित्र ते वाचे । तेणे होय साचे जन्मफळ ॥

- ८ -

*व्यास अंबरिष वशिष्ठ नारद । शौनक प्रल्हाद भागवत ॥*

*नित्य स्मरण करी यांचे जरि प्राणी । पुन्हा नाही खाणी चौऱ्यांशीची ॥*

*शुक पराशर मुनि पुंडलीक । अर्जुन वाल्मिक नाम गाती ॥*

*बलि बिभीषण भीष्म रुक्मांगद । बकदाल्भ्य शुक महाऋषी ॥*

*तुका म्हणे यांची नामे घेता वाणी । प्रत्यक्ष तो प्राणी देवा जैसा ॥*

*- ९ -*

*गीता भागवत देह उच्चारिता । पापाची तो वार्ता कोठे राहे ॥*

*सकळ वासना नामी जे रंगली ।। साधने राहिली मग कैची ॥*

*म्हणोनिया नेम जैसा तारी जीवा । होय तोची देवा आवडता ॥*

*उगवला दिवस जाये तो क्षणांत । विचारूनी हित वेगी करा ॥*

*तुका म्हणे स्मरा वेगी विठोबासी । न धरा मानसी दुजे काही ॥*

*- १० -*

*तीर्थाचे जे मूळ व्रताचे जे फळ । ब्रह्म ते केवळ विटेवरी ॥*

*ते आम्ही देखिले आपुले नयनी । फिटती पारणी लोचनांची ॥*

*जिवांचा जिव्हाळा कृपेचा सागर । उभा विटेवरी राहिलासे ॥*

*सुरवर चिंतती मानवांचे ध्यानी । सगुणी निर्गुणी तोचि एक ॥*

*तुका म्हणे नाही श्रुती आतुडले । आम्हां सांपडले गीती गाता ॥*

*- ११ -*

*राजस सुकुमार मदनाचा पुतळा ।। रविशशिकळा लोपियेल्या ॥*

*कस्तुरी लल्लाट चंदनाची उटी । रुळे माळ कंठी वैजयंती ॥*

मुकुट कुंडले श्रीमुख शोभले । मुख ते ओतिले सकळही ॥

कांसे सोनसळा पांघरे पाटोळा । घन नीळ सावळा दिसतसे ॥

सकळही तुम्ही व्हा गे एकीसवा । तुका म्हणे जीवा धीर नाही ॥

- १२ -

आवडे हे रूप गोजिरे सगुण । पाहता लोचन सुखावले ॥

आता दृष्टीपुढे असाच तूं राहे । जो मी तुज पाहे वेळोवेळां ॥

लाचावले मन लागलीसे गोडी । परि जीवे ना सोडी जैसे झाले ॥

तुका म्हणे आम्ही मागावे लडिवाळी । पुरवावी आळी पांडुरंगा ॥

- १३ -

शंख चक्र गदा रुळे वैजयंती । कुंडले तळपती दोन्ही कानी ॥

मस्तकी मुकुट नवरत्न हार । वरी पितांबर पांघुरला ॥

रत्नहिरे जडित कटी कडदोरा । रम्य शोभे हिरा बेंबीपाशी ॥

जडित कंकण कर्णी शोभे मुद्रिका । लाचावला तुका भेटीसाठी ॥

- १४ -

नेणें जप तप योगयुक्ति ध्यान । करितो चिंतन रात्रं दिवस ॥

नेणो काही देवा झालो उतराई । मागे लागो पाही बाळ जैसा ॥

भाव गंगोदके आम्ही शुद्ध पाहे । प्रक्षाळिले पाय विटेसहीत ॥

जन्मली जान्हवी ज्याठायी उत्तम । हरावया श्रम भाविकांचे ॥

तुका म्हणे आम्ही झालो पुण्यवंत । सेविले अमृत नामतीर्थ ॥

- १५ -

*परिमळ मिश्रित करून उटणे । नारायणा तेणें तोषविला ॥*

*पय घृत दधि मधु ते शर्करा । गोशृंगधारा अखंडित ॥*

*करोनि संयुक्त ओपियली ईशा । पंचामृते तैसा पंच विधी ॥*

*तुका म्हणे जेथे गंगे जन्म झाला । प्रसाद दिधला आम्हां लागी ॥*

*- १६ -*

*आपलिया घरी कष्ट तरी करी। आणेनी घागरी गंगोदक ॥*

*करोनि विनंती विनवितो तुम्हां । स्नान पुरूषोत्तमा करा वेगी ॥*

*उत्तम वस्त्राने पुसावे ते अंग । करोनि अभ्यंग सर्वांगासी ॥*

*परिधान वस्त्र केले पितांबरे । तेणे हे साजिरे रूप दिसे ॥*

*तुका म्हणे नेत्र पाहता निवाले । ध्यान संचरले हृदया माजी ॥*

*- १७ -*

*मन हा मोगरा अर्पनी ईश्वरा । पुनरपि संसारा येणे नाही ॥*

*मन हे सेवंती अर्पनि भगवंती । पुनरपि संसृती येणे नाही ॥*

*मन हे तुळशी अर्पूनी हृषिकेशी । पुनरपि जन्मासी येणे नाही ॥*

*तुका म्हणे ऐसा जन्म दिला देवा । तया वास व्हावा वैकुंठासी ॥*

*- १८ -*

*नाम पुष्प शुद्ध गळा घाला हार । विवेक सारासारतुरा लावू ॥*

*बोधभाळी बुक्का क्षमा तुळशी दळ । वाहता गोपाळ संतोषतो ॥*

*गाइलिया गुण संतोष तयाते । करिता कीर्तन आल्हादे तो ॥*

*आल्हादे हा देव किती वाखाणिता । पवाडें सांगता यांचे यास ॥*

*याचे यांस करू सर्व निवेदन । वारिल हा शीण संसारीचा ॥*

*संसारीचा वारा लागो नेदी अंगा । भावे पांडुरंगा आळवितो ॥*

*तुका म्हणे आतां उजळीली आरती । भावे तो श्रीपती ओवाळूया ॥*

*- १९ -*

*शब्दाचिया भावे केला उपचार । तेणे सर्वेश्वर संतोषला ॥*

*शब्दाचिया करा करविले भोजन । धाला नारायण तेणे सुखे ॥*

*शब्दाचिया कर करविले आचमन । तांबूल अर्पून फळे पुष्पे ॥*

*तुका म्हणे अन्ना आधी धूप दीप । उपचार अल्प समर्पिले ॥*

*- २० -*

*मजलागी नाही ज्ञानाची ती चाड । वाचे घेता गोड नाम तुझे ॥*

*नेणते लेकरूं आवडीचे नाते । बोले वचनाते आवडीने ॥*

*भक्तिवीण काही वैराग्य ते नाही । घालता विठाई भार तुज ॥*

*तुका म्हणे नाचुं निर्लज्ज होऊनी । नाही माझे मनी दुजा भाव ॥*

*- २१ -*

*पूजूं नारायण मानाचे सुमने । मंत्र पुष्प तेणे वाहियेले ॥*

*भावाचे पै हाती जोडुनी ओंजळ । समर्पिले जळ बुद्धिभावे ॥*

*मुखशुद्धि तांबुल दिले तुळसीदल । आनंद सकळ ओसंडला ॥*

*तुका म्हणे आता उरले की नाही । नामाविण काही बोलावया ॥*

*- २२ -*

*समाधान चित्ताचे चरणा अलिंगन । पायांवरी मन स्थिरावले ॥*

जैसे केले तैसे घालू लोटांगणा । करू प्रदक्षिणा नमस्कार ॥

प्रार्थितो मी तुज राहे माझे पोटी । हृदयसंपुटी देवराया ॥

क्षेम अलिंगन दिधली पायी मिठी । घेतलीसे कुटी अमूप हो ॥

तुका म्हणे आता आनंदी आनंद । गाऊ परमानंद मनासंगें ॥

- २३ -

काय उपचार करूं पांडुरंगा । हेचि मज सांगा विचारूनी ॥

कोणता पदार्थ उप तुजपाशी । बोलाया वाचेसी मौन पडे ॥

शंकर शेषादि करिती स्मरण । तेथे माझे मन गाऊं शके ॥

इंद्र सुरवर वहाती सुमने । तेथे म्यां वहाणे काय एक ॥

परी आवडीने जोडूनी ओंजळ । बुक्का वाहू माळ तुळशीची ॥

उणे पुरे तुम्ही करूनियां सांगा । जिवालागी मग सुख तेव्हा ॥

तुका म्हणे माझी ऐकावी प्रार्थना । तुम्ही नारायण सेवकाची ॥

- २४ -

कैसे करूं ध्यान कैसे पाहूं तुज । वर्म दावी मज याचे काही ॥

कैसी करूं भक्ती कैसी करू सेवा । कोण्या भावे देवा आतुडशी ॥

कैसा गाऊं गीती कैसा ध्याऊं चित्ती । कैसी स्थिती मति न कळे मज ॥

कैशी कीर्ती वानूं कैसा लक्षी आणू । जाणे हा कवळ कैसा तुज ॥

तुका म्हणे दास जैसे केले देवा । तैसे अनुभवा आणि मज ॥

- २५ -

काय तुज कैसे जाणावे गा देवा । आणावे अनुभवा कैसेपरी ॥

*सगुण निर्गुण स्थूळ की लहान । नकळे अनुमान मज तुझे ॥*

*कोणता निर्धार करू हा विचार । भव सिंधु पार तरावया ॥*

*तुका म्हणे कैसे पाय आतुडती । नकळे श्रीपति वर्म मज ॥*

- २६ -

*स्तुति करूं तरी कोण माझी मती । वेदां पडे भ्रांति हे आश्चर्य ॥*

*परि हा जिव्हाग्री रामकृष्ण हरी । बसवी लौकरी याती गुण ॥*

*रूपगुण कीर्ति कृपाळू उदार । वर्णाविया पार ब्रह्मा नेणे ॥*

*रूपी नामी शिव होऊनिया वेडा । वर्णिला पवाडा रामनामी ॥*

*तुका म्हणे उज नेणवेचि शीव । नाही राहिला वाव बोलावया ॥*

- २७ -

*नामाचा प्रताप न वर्णवे मज । सांगा गरुडध्वज राहे तेथे ॥*

*मज वाचा किती परतल्या श्रुती । वेदमुखे श्रुती मौन ठेले ॥*

*वर्ण नेणे शेष नामाचा पवाडा । चिरलीया रांडा जिव्हा त्याच्या ॥*

*अनुसरली रमा वर्णाविया श्रीहरी । पायांची किंकरी होऊन ठेली ॥*

*तुका म्हणे आम्ही मानव किंकर । वर्णाविया पार न कळे तुझा ॥*

- २८ -

*आम्ही मानवांनी वर्णावे ते काय । सुरवर पाय बंदीताती ॥*

*गणेश शारदा करिती गायन । आदिदेव गण श्रेष्ठ श्रेष्ठ ॥*

*जयाच्या गायना तिष्टतो शंकर । तयासी पै पार न कळे तुझा ॥*

*तुका म्हणे आम्ही किंकर । ते गिती इंद्राची ती गती नागविली ॥*

- २९-

अगा महाविष्णु अनंत भुजांचा । आम्हां अनाथांचा सोयरिया ॥

न कळे महिमा वेद मौनावती । तेथे माझी मती कोणाकडे ॥

तुका म्हणे आम्ही बाळ तूं माऊली करावी साऊली करुणेची ॥

- ३० -

नमो विष्णुरूपा अगा मायबापा । अपार अमूपा पांडुरंगा ॥

विनवितो दास रंक मी सेवक । वचन ते ऐक माझे ॥

करिता तुझी स्तुति वेद पै भागले । निवांतचि ठेले नेति नेति ॥

तुका म्हणे तेथे काय माझी वाणी । जे तुझी वाखाणणी कीर्ति देवा ॥

- ३१ -

विनवावे ऐसे भाग्य नाही देवा । पायांसि केशवा सलगी केली ॥

धीटपणे पत्र लिहिले आवडी । पार नेणे तडी मती माझी ॥

जेथे वेदां तुझा न कळेची पार । तेथे मी पामर काय वानू ॥

जैसे तैसे माझे बोल अंगिकारी । बोबड्या उत्तरी गौरवितो ॥

तुका म्हणे विटेवरी जी पाऊले । तेथे मी ठेविले मस्तक हे ॥

- ३२ -

त्रिगुण आटीव वाचेचा पसारा । पडले विचार सर्व रस ॥

आदि मध्य अंती नाही अवसान । जीवनी जीवन मिळोनि गेले ॥

रामकृष्ण नाम माळ ही साजिरी|| ओविली गोजिरी कर्णी मनी ॥

तुका म्हणे तनु झाली ही शितळ । आवडी सकळ ब्रह्मानंदे ॥

*इतुके करी देवा हे ऐसे वचन । समूळ अभिमान जाळी माझा ॥*

*इतुके करी देवा ऐकावी ही गोष्टी । सर्व सम दृष्टि तुज देखूं ॥*

*इतुके करी देवा ऐकावी हे खूण । संत चरण रज वंदू आतां ॥*

*भलतिया भावे तारी पंढरी राव । तुका म्हणे भावे शरण आलो ॥*

*: सार्थ तुकाराम हरिपाठ समाप्त :-*